**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करते की,

माझे नाव – लिला खंडू पवार

माझे वय ४५ वर्षे व्यवसाय शेती व घरकाम

राहणार मुथाळणे, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी वकील श्रीमती एस.ए.भोसले यांचेमार्फत</u>–**

१. आमची शेतजमीन मुथाळणे गावामध्ये आहे. आमच्या जमिनीलगत आरोपी चंद्रभान रामकृष्ण पवार याची जमीन आहे. ०६–२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजता आमचे शेतामध्ये मंचींग पेपर अंथरलेला असताना आरोपीच्या म्हशी त्यावर आल्याने मी त्या म्हशींना हुसकाविण्यासाठी गेले. मी म्हशी हुसकाविण्यासाठी गेले असता आरोपीने मला मारहाण केली. माझे पती खंडू रावजी पवार हे खताची गोणी घेवून येत होते. आरोपीने माझे पती खंडू पवार यांच्या डाव्या कानाचा चावा घेतला. मी माझा मुलगा राहूल याला फोन करून घटनेबाबत सांगितले. माझा भाचा शुभम हा तेथे आला व त्याने आम्हाला समशेरपूर येथील सरकारी दवाखान्यात नेले. तेथे आमच्यावर उपचार झाल्यानंतर माझे पती खंडू रावजी पवार यांनी अकोले पोलीस ठाणे येथे येवून आरोपीविरूध्द फिर्याद दाखल केली. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला आहे. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकते. आजरोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**<u>आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.डी.के.केदार यांचेतर्फे उलटतपास–</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की, आमचे व आरोपीमध्ये शेतीच्या बांधावरून वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या जमिनीच्या व आरोपीच्या जमिनीच्या दक्षिणेला व पश्चिमेला वन खात्याची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, वन

खात्याच्या जमिनीमध्ये दाट झाडी व गवत असल्याने गावातील लोक तेथे जनावरे चारण्यासाठी नेतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या म्हशी वन खात्याच्या जमिनीमध्ये चरत असताना चुकून त्या म्हशी शेताच्या कडेला आल्या. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी व माझे पती मोटारसायकलीवरून गावातून येत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आमचे आरोपीशी पूर्वीपासून वाद असल्याने आम्ही आरोपीला मारहाण करण्यास सुरुवात केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीच्या गुप्तांगाला पिरगाळले. हे म्हणणे खरे नाही की, त्या झटापटीमध्ये आरोपी खाली जमिनीवर पडला व माझे पती देखील डाव्या कानावर पडले. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती डाव्या कानावर पडल्यामुळे त्यांना दुखापत झाली आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी कसाबसा आमच्या तावडीतून सुटून घरी पळत गेला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा घरात जावून त्याने दरवाजा लावून घेतलेला असताना देखील आम्ही त्याच्या दरवाजावर दगडे फेकत होतो. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीला शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने मला मारहाण केलेली नाही व माझ्या पतीच्या डाव्या कानाला चावा देखील घेतलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला अद्दल घडविण्यासाठी व त्याला शिक्षा व्हावी म्हणून आम्ही त्याचेविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2026.01.07 17:57:47 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – ०७.०१.२०२६**